# धर्मग्राम प्री-सिनड उपक्रम

## A : प्रार्थना : (२० मिनिटे)

- पवित्र आत्म्याला आवाहन करणे (गायन)
- देवाचा शब्द (लूक २४:१३-३२)
- देवाच्या शब्दावर मनन करणे
- मूक ध्यान
- सिनडसाठी प्रार्थना

## B : प्रमुख धर्मगुरूंचे अध्यक्षीय भाषण : (१० मिनिटे)

प्रमुख धर्मगुरू उपस्थितांचे स्वागत करतात आणि धर्मग्राम प्री-सिनडची गतिशीलता स्पष्ट करतात. धर्मग्राम सल्लामसलत टप्प्याच्या प्रक्रियेवरही ते माहिती देऊ शकतात.

## C : पहिली पायरी : धर्मग्रामाचे प्रोफाईल (१५ मिनिटे)

सिनड कोअर कमिटी सदस्यांपैकी एक जण कामकाज दस्तऐवजाचा (working document) धर्मग्राम प्रोफाइल आशय वाचतो, ज्यामध्ये सल्लामसलत केलेल्या गटांची नावे, सल्लामसलत करण्याची पद्धत आणि धर्मग्रामाचे वेगळेपण यांचा समावेश आहे. जमलेले सर्वजण त्याला मान्यता देतात. (हे धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे पहिले पान.)

## D : दुसरी पायरी : सल्लामसलत अनुभव आणि मजबूत साक्षी (१५ मिनिटे)

सिनड कोअर कमिटीचा आणखी एक सदस्य अर्थपूर्ण गोष्टी, भक्कम साक्षी आणि सल्लामसलतीचे अनुभव वाचतो. वाचलेले अनुभव जमलेले सभासद दुरूस्त करतात (edit करतात) व त्याला मान्यता देतात. (हे धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे दुसरे पान.)

## E : तिसरी पायरी : सद्यःस्थिती - मुद्यांचे संश्लेषण (३० मिनिटे)

कामकाज दस्तऐवजामध्ये केल्या जाणाऱ्या मुद्यांच्या संश्लेषणाची पृष्ठे सर्वांच्या फायद्यासाठी वाचली जावी. इथे ती पृष्ठे फक्त वाचली जावी आणि त्याच्यावर कोणतीही चर्चा होऊ नये. (हे धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे तिसरे, चौथे, पाचवे आणि सहावे पान आहे.)

## F : चौथी पायरी : पारख करण्याचा (विवेकबुद्धीचा) टप्पा (२ ते ३ तास)

या गटाचे ५ उपगट केले असून प्रत्येक गटाला एक विषयानूरूप विषय दिला जातो, ज्यामध्ये आपापसातील विवेकबुद्धीसाठी गावपातळीवर प्रश्न / मुद्दे उपस्थित केले जातात. मसुदा तयार करणाऱ्या टिमचे सदस्य विविध उपगटांमध्ये विभागले गेले आहेत. विषयावरील प्रत्येक मुद्दा उपगटात खाली दिलेल्या सात प्रश्नांच्या साहाय्याने चर्चिला आहे :

१. सर्वोत्तम चालीरिती चालू ठेवल्या आहेत हे आपण कसे सुनिश्चित करू शकतो?

२. समस्या क्षेत्र म्हणून परिभाषित केलेल्या विशिष्ट प्रश्नासह आपल्यासमोर कोणते आव्हान आहे? या विशिष्ट खुल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी धर्मग्राम पातळीवर काय करण्याची गरज आहे? या आव्हानाला आपण कशा प्रकारे प्राधान्य देऊ शकतो?

३ एखाद्या विशिष्ट प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आपल्या संस्कृतीत, आपल्या मनोवृत्तीत आणि पाळकिय कार्यपद्धतीमध्ये कोणते बदल करण्याची गरज आहे? चर्चमधील काही गोष्टींवरील विश्वास गमावल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे का? चर्चमधील गोष्टी बदलण्याचे आव्हान काय आहे?

४. चांगले प्रशासन आणि अधिकार ह्यासाठी पुढे जाण्याचा मार्ग काय आहे?

५. हे असे क्षेत्र आहे का जेथे आपणास आपल्या चर्चमध्ये पुनर्संचय आणि परिवर्तनाची आवश्यकता आहे? वैयक्तिक आणि सामुदायिक सलोख्याला अडथळा ठरणारे हे क्षेत्र आहे का?

६. चर्चचे मिशन अधिक परिणामकारक बनण्यासाठी कोणती पावले उचलण्याची गरज आहे?

७. आपण आपले चर्च सर्वांसाठी सुलभ आणि सर्वसमावेशक कसे बनवू शकतो? परमेश्वराचे राज्य नेमके कोठे आहे?

सर्व गट एकत्र येऊन त्यांचे संश्लेषण इतरांबरोबर शेअर करतात. (धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे हे सातवे आणि आठवे पान आहे)

### G : पाचवी पायरी : पारख केल्यानंतर (विवेकबुद्धीनंतर) (२ तास)

पुढचा मार्ग (सहप्रवासाचे प्रस्ताव) कसा असेल हा प्रस्ताव संपूर्ण गटाला वाचून दाखवला जातो आणि संपूर्ण गटाकडून आलेल्या अतिरिक्त मुद्यांची नोंद केली जाते. सर्वोत्कृष्ट चालीरिती, नवीन मार्ग, व्यक्त केलेली स्वप्ने यावर चर्चा केली जाते आणि त्यांना प्राधान्य दिले जाते. (ही चर्चा धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे नववे पान आहे.)

### H : सहावी पायरी : प्रक्रियेचा आढावा (३० मिनिटे)

सिनडल प्रक्रियेची फळे या टप्प्यामध्ये आढळतात. ही प्रक्रिया सुरू ठेवण्याच्या विविध मार्गांवर चर्चा केली जाते. ह्या संपूर्ण प्रक्रियेत पवित्र आत्म्याने आणलेली संवेदनशिलता सहभागी झालेले सभासद शेअर करतात. शिकलेल्या मुख्य गोष्टी हेरल्या जातात. (ही चर्चा धर्मग्राम प्री-सिनड अहवालाचे दहावे पान आहे.)

### I : सातवी पायरी : समारोपाची प्रार्थना (१५ मिनिटे)

ह्या सत्राचा शेवट ध्यानमय आणि फादरांच्या आशीर्वादाने केला जातो.

**(विशेष टीप : जर धर्मग्राम प्री-सिनड २ दिवसांचे सत्र असेल तर पायऱ्या एक ते चार पहिल्या दिवशी असतील आणि पायऱ्या पाच ते सात दुसऱ्या असतील.)**